**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक ०६ जुलै २०२५**

**ठळक बातम्या**

- **पंढरपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शासकीय महापूजा संपन्न / पांडुरंगानं राज्यावरची संकटं दूर करण्याची शक्ती द्यावी, बळीराजाला सुखी, समाधानी ठेवण्यासाठी आशीर्वाद द्यावा असं मुख्यमंत्र्यांचं पांडुरंगाचरणी साकडं.**
- **आषाढी एकादशीनिमीत्त राज्यात भक्तिमय वातावरण.**
- **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'महाराष्ट्रधर्म' विशेष पॉडकास्टचा आजपासून प्रारंभ.**
- **ऊस उत्पादन वाढीसाठी एआय तंत्रज्ञान ठरेल फायद्याचे- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे, ॲग्रोव्हिजन फाउंडेशनच्या कार्यशाळेत प्रतिपादन.**

**आता सविस्तर बातम्या .......**

मुख्यमंत्री-विठ्ठल पूजा

पांडुरंगान राज्यावरची संकटं दूर करण्याची शक्ती द्यावी, सन्मार्गान चालण्याची सुबुद्धी द्यावी, बळीराजाला सुखी, समाधानी ठेवण्यासाठी आशीर्वाद द्यावा, असं साकडं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विठ्ठलाला घातलं. आषाढी एकादशीच्या निमित्तान आज पहाटे मानाच्या वारकरी दांपत्यासह फडणवीस यांनी सपत्निक, विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा केली. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीनं मुख्यमंत्र्यांचा सत्कार केला. पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन आणि इतर यावेळी उपस्थित होते. वारीची परंपरा सतत वाढत असून या वारकऱ्यांमध्ये तरुणांची संख्या मोठी असल्याची बाब मुख्यमंत्र्यांनी अधोरेखित केली. विठ्ठल आणि रुक्मिणी माता मंदिरांत, आता व्हीआयपी दर्शनावर मर्यादा घालत असल्याचही त्यांनी सांगितल.....

***(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस- 28 सेकंद)***

***मला या ही गोष्टींचा आनंद आहे की यावेळी पालकमंत्र्यांनी आणि जिल्हा प्रशासनाने हा निर्णय घेतला की व्हीआयपी दर्शन जे आहे ते कमी करावं ते बंद***

***करावं. अगदी नेमक्या लोकांना त्या ठिकाणी जिथे आहेत ती व्यवस्था म्हणून आपण त्या ठिकाणी आपण अलाउ केलं. याचा परिणाम असा झाला की आमचे जे सामान्य भक्त आहेत, जे वारकरी आहेत, यांचा दर्शनाचा कालावधी हा पाच तासाने कमी झाला मला असं वाटतं हे अत्यंत महत्वाचे आहे.***

वारीनं खऱ्या अर्थानं भागवत धर्माची पताका उंचावत ठेवली आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. सर्व विठ्ठलभक्तांनी वारीच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश गावोगावी घेऊन जावा, असं आवाहन त्यांनी केलं. शासकीय महापूजेच्या मानाच्या वारकरी दांपत्याचा सन्मान, तसंच पायी स्वच्छता आणि सामाजिक विषयांवर प्रबोधन करणाऱ्या दिंड्यांचा श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कारानं सन्मानही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते यावेळी झाला.

आषाढी एकादशी

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना आषाढी एकादशी निमित्त शुभेच्छा दिल्या. विठूमाऊली आपल्या समाजाला आनंदाची आणि समृद्धीची वाट दाखवेल, अशी भावना त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे व्यक्त केली. आषाढी एकादशीनिमित्त राज्यभरात विविध विठ्ठल मंदिरांमध्ये भक्तांचा महासागर लोटला आहे. सर्वत्र जय हरी विठ्ठल आणि पांडुरंग हरीचा जयघोष आणि टाळ-मृदंगाच्या गजरात मंदिर परिसर दुमदुमून गेल्याचं वातावरण आहे. मुंबईतील वडाळ्याच्या प्रती पंढरपूर असलेल्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सपत्नीक विठुरायाची पूजा केली. यावेळी शिंदे यांनी मंदिराच्या विकास आणि सुशोभीकरणासाठी मंजूर केलेल्या २५ कोटी रुपयांच्या कामांना लवकरच सुरुवात होईल, असं सांगितलं. बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथील संत गजानन महाराजांच्या समाधीस्थळाच्या दर्शनासाठीही भक्तांची मोठी गर्दी दिसून आली. जालना येथे आषाढी एकादशीनिमित्त श्री आनंदी स्वामींची पालखी मिरवणूक काढण्यात आली.विदर्भाचे पंढरपूर म्हणून प्रसिद्ध असलेल्या नागपूर जिल्ह्यातील धापेवाडा येथील स्वयंभू श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान येथे सकाळपासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती, ही यात्रा चार दिवस सुरू राहणार आहे.

अशूरा-ए-मुहर्रम

अशूरा-ए-मुहर्रम आज देशाच्या विविध भागात पाळला जात आहे. प्रेषित मोहम्मद यांचे नातू हजरत इमाम हुसैन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सत्य आणि न्यायासाठी करबाला इथं दिलेल्या बलिदानाची आठवण म्हणून हा दिवस पाळला जातो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या निमित्तानं या बलिदानाचं स्मरण करून, यातून लोकांना बिकट परिस्थितीत सत्याच्या बाजूनं उभं राहण्याची प्रेरणा मिळत असल्याचं प्रतिपादन त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे केलं आहे.

पॉडकास्ट

‘महाराष्ट्राचा इतिहास गौरवशाली आहे. आणि ती एक जबाबदारी देखील आहे. आपण ज्ञानेश्वरांचे, शिवरायांचे, क्रांतीज्योती सावित्रीबाईंचे आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे थेट वशंज नसलो, तरीही विचारांच्या वारश्याचे वाहक आहोत. या सर्वांनी आपल्या ज्ञानान, त्यागान आणि धैर्यान हे राज्य घडविल. त्याला जपण, वाढवण आणि पुढे नेण हे आपल कर्तव्य आहे. महाराष्ट्रधर्म म्हणजे स्मरण रंजन नाही. तो आपला नैतिक मार्गदर्शक. आपण कोण आहोत, हे समजून घेऊन, आपल्याला काय घडवायच आहे, ते ठरविण, हाच महाराष्ट्रधर्म आहे,’ अशी मांडणी करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आजपासून ‘महाराष्ट्रधर्म’ विशेष पॉडकास्ट मालिकेचा प्रारंभ केला. ही मुलाखत सुप्रसिद्ध विचारवंत, संत साहित्याचे अभ्यासक - लेखक आणि जगद्गुरू तुकाराम महाराज यांचे वंशज डॉ. सदानंद मोरे यांनी घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 2014 ते 19 या आपल्या पहिल्या कार्यकाळात ‘मी मुख्यमंत्री बोलतोय’ हा टि.व्ही. शो केला होता. आता नवमाध्यमात लोकप्रिय अशा पॉडकास्टच्या माध्यमातून ते जनसंवाद साधणार आहेत.

ऊस कार्यशाळा

जगातील सर्वोत्तम अद्ययावत ज्ञान आणि आपल्या जवळच्या माणसांनी केलेले यशस्वी प्रयोग समजून घेत शेतकऱ्यांना पुढे जावे लागणार आहे. शेतीतील उत्पादन खर्च कमी करणे आणि उत्पादन वाढवण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि अत्याधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर ऊस, सोयाबीन, कापूस, संत्रा आदी पिकांचे उत्पादन वाढविण्यासाठी फायद्याचा ठरू शकतो, असा विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज व्यक्त केला.....

*(होल्ड बाईट - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी 15 सेकंद)*

***यामध्ये येणाऱ्या काळामध्ये उत्पादन खर्च कमी करून वाढवण्याचे जे टेक्निक्स आहे आणि ज्यात (AI) चा उपयोग आहे, त्या सगळ्याचा नॉलेज आपल्या सगळ्यांना मिळाला आहे आणि आपण हे ट्रान्सफॉर्म केलं पाहिजे हे आपण आपल्या गावातल्या लोकांना मीटिंग घेऊन तुम्ही समजावून सांगा.***

ॲग्रोव्हिजन फाउंडेशनतर्फे ऊस शेतीसाठी एआय तंत्रज्ञान या विषयावर विशेष कार्यशाळेच आयोजन,  अमरावती रोड स्थित एनबीबीएस सभागृह, (राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण व भूमी उपयोग संस्थान) येथे झालेल्या या कार्यशाळेला नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती होती. नितीन गडकरी यांनी सभागृहात शेतकऱ्यांच्या मध्ये बसूनच एआय वापराच्या संदर्भातील प्रेझेंटेशन बघितल. तज्ज्ञांनी केलेल मार्गदर्शन ऐकल. त्यानंतर त्यांनी बराचवेळ खाली बसूनच शेतकऱ्यांसोबत संवाद साधला.

हवामान

गेल्या काही दिवसातल्या समाधानकारक पावसामुळे बुलढाणा जिल्ह्यात ९० टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. यंदा जिल्ह्यात ३ लाख ९७ हेक्टरवर सोयाबीन पेरणी झाली असून, १ लाख १६ हजार १३३ हेक्टरवर कापसाची लागवड केली गेली आहे. त्याचबरोबर १३ हजार ९३८ हेक्टरवर उडदाची पेरणी झाली आहे. येत्या काही तासांत अमरावती, अकोला, नागपूर, बुलढाणा, वर्धा, वाशिम, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागान वर्तवली आहे.

क्रिकेट

भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यावर भारतानं मजबूत पकड घेतली आहे. काल सामन्याच्या चौथ्या दिवशी भारतानं विजयासाठी दिलेल्या ६०९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, दुसऱ्या डावात इंग्लंडच्या ३ बाद ७२ धावा झाल्या होत्या. आज सामन्याचा शेवटचा दिवस असून, या सामन्यात विजय मिळवून मालिकेत बरोबरी साधण्याची मोठी संधी भारताकडे आहे. भारतीय

प्रमाणवेळेनुसार दुपारी ३:३० वाजता पुन्हा सुरू होणारा पाचव्या दिवसाचा सामना पावसामुळे उशिरा सुरू झाला. त्यापूर्वी, चौथ्या दिवशी, भारतीय कर्णधार शुभमन गिलने कसोटी इतिहासातील सर्वोत्तम वैयक्तिक कामगिरी केली. गिलने दोन्ही डावांमध्ये ४३० धावा केल्या, पहिल्या डावात २६९ आणि दुसऱ्या डावात १६१धावा केल्या होत्या.

*****